राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र कार्यालयातील
पदांचा सुधारीत आकृतीबंध.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.३७/का-३७,**
मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ एप्रिल, २०१९.

**वाचा** : १. शासन आदेश क्र. रानिआ-१००२/२७०/प्र.क्र.१५/२००२(भाग-२)/३७, दिनांक ७ एप्रिल, २००७.
२. मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १७/३/२०१८ रोजी झालेल्या बैठकीची दि. ३.४.२०१८ व दि.२०/१२/२०१८ ची इतिवृत्ते

**प्रस्तावना :-**

राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा एक स्वतंत्र सांविधानिक संस्था असून संविधानात नमूद केलेल्या परिच्छेद २४३ के (३) नुसार राज्य निवडणूक आयोगाच्या निर्धारणाप्रमाणे सर्व मनुष्यबळ पुरविणे शासनावर बंधनकारक आहे.

**243K. (3) The Governor of a State shall, when so requested by the State Election Commission, make available to the State Election Commission such staff as may be necessary for the discharge of the functions conferred on the State Election Commission by clause (1)**

**राज्य निवडणूक आयोगाकडे अस्तित्वात असलेल्या समान वेतनश्रेणीच्या संवर्गाचे एकत्रिकरण करण्याचे प्रस्तावित होते, तसेच संगणक चालक व ग्रंथपाल ही एकाकी पदे असल्याने त्यांना पदोन्नतीच्या संधी नव्हत्या. याकरीता त्यांचा समावेश लिपीक-टंकेलेखक या संवर्गात करणे, ब-याच कालवधीपासून रिक्त असलेली शिपायांची ३ पदे निरसीत करणे याबाबत शासन स्तरावर विचाराधीन होते.**

२. उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१७ मार्च,२०१८ बैठकीमध्ये राज्य निवडणूक आयोगाच्या पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. इतिवृत्तासोबतचे सुधारित विवरणपत्र क्रमांक पदनि-२०१८/प्र.क्र.२२/१८/विसु-१, दिनांक २० डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये निर्गमित केले आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भ ३ प्रमाणे राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील ७९ पदांचा आकृतीबंधास सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार मंजूरी दिली आहे.

२. राज्य निवडणूक आयोगातील ३१ संवर्गापैकी समान वेतनश्रेणीच्या आधारावर २२ संवर्गाचे ६ संवर्ग तयार करण्यात आले असून, उर्वरीत ९ संवर्गात कोणताही बदल न करता एकूण १५ संवर्ग तयार करण्यात आले आहेत.

३. राज्य निवडणूक आयोगातील ग्रंथपाल व संगणक चालक ही एकाकी पदे असल्याने, त्यांचा लिपीक टंकलेखक या संवर्गामध्ये समावेश करण्यास मान्यता दिली आहे. तथापि, सदर संवर्गात आल्यावर संबंधितांनी

लिपीक-टंकलेखक संवर्गासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करणे आवश्यक राहील. तसेच, त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने कोणतेही आर्थिक लाभ, थकबाकी तसेच दावा करता येणार नाही. याबाबतचे बंधपत्र संबंधीतांकडून करुन घेण्यात येईल.

४. राज्य निवडणूक आयोगातील बऱ्याच कालावधीपासून रिक्त असलेली शिपाई संवर्गातील ३ पदे निरसीत करण्यास मान्यता दिली आहे.तसेच आवश्यकतेनुसार शासनाचे धोरणानुसार राज्य निवडणूक आयोगास बाह्यस्त्रोताव्दारे किवा सेवानिवृत्त शासकीय सेवकांमधून करारपध्दतीने पदे भरता येतील.

५. या पदांवरील येणारा खर्च लेखाशिर्ष २०७०, इतर प्रशासनिक सेवा-८००, इतर खर्च (००) (०८) राज्य निवडणूक आयोग (२०७०-०६४८) (मागणी क्रमांक ए-४) या खालील चालू वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ३५ /आपुक, दि.११.०४.२०१९अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१२१५५६०१७९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सुरेश कळसकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२. मा.अपर मुख्य सचिव,(वित्त विभाग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव तथा मु.रा.अ.यांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई मुंबई
५. मा.सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक शाखा), नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई ३२
१०. उपसचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११. उपसचिव,(कार्या-३७/कार्या-२५/कार्या-१९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२. अवरसचिव,( र्या-३७/), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१३. वित्त विभाग (व्यय ४/अर्थसंकल्प १९/वित्तीय सुधारणा-१), मंत्राालय,मुंबई-३२
१४. निवडनस्ती (कार्या-३७)

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१६/प्र.क्र.३७/का-३७, दिनांक १२ एप्रिल,२०१९ चे सहपत्र

## राज्य निवडणूक आयोगातील आस्थापनेवरील मंजूर पदांचा आकृतीबंध

| सध्याचा आकृतीबंध | | | | सुधारित आकृतीबंध | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **सध्याचे पदनाम** | **वेतनश्रेणी व ग्रेड पे<br>६ व्या वेतन आयोगानुसार** | **पदसंख्या** | **अ.क्र.** | **संवर्ग** | **वेतनश्रेणी<br>७ व्या वेतन आयोगानुसार** | **पदसंख्या** |
| १ | सचिव,राज्य निवडणूक आयोग (संवर्ग पद) | ३७४००-६७०००-८७०० | १ | १ | सचिव,राज्य निवडणूक आयोग (संवर्ग पद) | एस-२७ :११८५००-२१४१०० | १ |
| **गट-अ** | | | | | | | |
| २ | उप सचिव/ सह सचिव | १५६००-३९१००-७६०० | १ | २ | उप सचिव संवर्ग (उप सचिव-सर्व विभाग, अपर जिल्हाधिकारी/ अति.मुख्य कार्य अधिकारी व समकक्ष ) | एस-२५ :७८८००-२०९२०० | २ |
| ३ | उप आयुक्त (अपर जिल्हाधिकारी समकक्ष) | १५६००-३९१००-७६०० | १ | | | | |
| **अ.क्र.४ ते ७ व ९ व १०या पदांसाठी **** | | | | | | | |
| ४ | अवर सचिव | १५६००-३९१००-६६०० | ३ | ३ | अवर सचिव संवर्ग (अवर सचिव/उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ तहसिलदार व समकक्ष ) | एस-२३ :६७७००-२०८७०० | ८ |
| ५ | विधी अधिकारी | १५६००-३९१००-६६०० | १ | | | एस-२३ :६७७००-२०८७०० | |
| ६ | सहायक आयुक्त (उपजिल्हाधिकारी समकक्ष) | १५६००-३९१००-५४०० | २ | | | एस-२० :५६१००-१७७५०० | |
| ७ | तहसिलदार | १५६००-३९१००-५००० | २ | | | एस-१९ :५५१००-१७५१०० | |
| | | | | | | | |
| ८ | वरिष्ठ स्वीय सहायक | १५६००-३९१००-६६०० | १ | ४ | वरिष्ठ स्वीय सहायक | एस-२३ :६७७००-२०८७०० | १ |
| ९ | निवडश्रेणी लघुलेखक (स्वीय सहायक) | ९३००-३४८००-४६०० | १ | ५ | निवडश्रेणी लघुलेखक (स्वीय सहायक) | एस-१६ :४४९००-१४२४०० | १ |
| १० | माहिती व जनसंपर्क अधिकारी | ९३००-३४८००-५००० | १ | ६ | सहायक आयुक्त (जनसंपर्क ) | एस-१९ : ५५१००-१७५१०० | १ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गट-ब (राजपत्रित) अ.क्र.११ ते १३ या पदांसाठी * * | | | | | | | |
| ११ | कक्ष अधिकारी | ९३००-३४८००-४८०० | ४ | **७** | कक्ष अधिकारी संवर्ग | एस-१७ :४७६००-१५११०० | ८ |
| १२ | सांख्यिकी अधिकारी | ९३००-३४८००-४४०० | १ | | | एस१५ :४१८००-१३२३०० | |
| १३ | नायब तहसिलदार | ९३००-३४८००-४३०० | २ | | | एस-१४ :३८६००-१२२८०० | |
| १४ | लेखा अधिकारी | ९३००-३४८००-४६०० | १ | | | एस-१६ :४४९००-१४२४०० | |
| गट-ब (अराजपत्रित) अ.क्र.१५ ते १७ या पदांसाठी * * | | | | | | | |
| १५ | रोख लेखापाल | ९३००-३४८००-४३०० | १ | ८ | सहायक कक्ष अधिकारी संवर्ग | एस-१४ :३८६००-१२२८०० | १३ |
| १६ | सहायक | ९३००-३४८००-४३०० | १० | | | एस-१४ :३८६००-१२२८०० | |
| १७ | अनुवादक (मराठी) | ९३००-३४८००-४२०० | १ | | | एस-१३ :३५४००-११२४०० | |
| १८ | उप लेखापाल | ९३००-३४८००-४२०० | १ | | | एस-१३ :३५४००-११२४०० | |
| १९ | उच्चश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८००-४४०० | ४ | ९ | उच्चश्रेणी लघुलेखक | एस१५ :४१८००-१३२३०० | ४ |
| २० | निम्नश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८००-४३०० | ६ | | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१४ :३८६००-१२२८०० | ६ |
| गट- क अ.क्र.२१ ते २६ या पदांसाठी * * | | | | | | | |
| २१ | ग्रंथपाल | ५२००-२०२००-२८०० | १ | **१०** | लिपिक-टंकलेखक संवर्ग | एस-१० : २९२००-९२३०० | २० |
| २२ | सांख्यिकी सहायक | ५२००-२०२००-२८०० | १ | | | | |
| २३ | रोखपाल | ५२००-२०२००-१९०० | १ | | | एस-६ : १९९००-६३२०० | |
| २४ | देयक लेखपाल | ५२००-२०२००-१९०० | २ | | | | |
| २५ | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२००-१९०० | १४ | | | | |
| २६ | संगणक चालक | ५२००-२०२००-१९०० | १ | | | | |
| २७ | वाहन चालक | ५२००-२०२००-१९०० | ३ | ११ | वाहन चालक | एस-६ : १९९००-६३२०० | ३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गट-ड | | | | | | | |
| २८ | नाईक | ४४४०-७४४०-१६०० | १ | १२ | नाईक | एस-३ : १६६००-५२४०० | १ |
| २९ | रोनिओ यंत्रचालक | ४४४०-७४४०-१६०० | १ | १३ | रोनिओ यंत्रचालक | | १ |
| ३० | झेरॉक्स यंत्रचालक | ४४४०-७४४०-१६०० | १ | १४ | झेरॉक्स यंत्रचालक | | १ |
| ३१ | शिपाई | ४४४०-७४४०-१३०० | ११ | १५ | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | ८ |
| | एकूण | | ८२ | | | | ७९ |

** निम्न वेतनसंरचनेच्या पदावरील अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावयाची असल्यास वित्त विभागाच्या मान्यतेने श्रेणी अवनत करुन अशा अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०१६/८६/प्र.क्र.३७/कार्या-३७
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरूचौक,
मुंबई - ४०० ०३२
दि. २२ जुलै,२०१९

प्रति,

सह सचिव ,
राज्य निवडणूक आयोग,
१ ला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई-३२

विषय - राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित आकृतीबंधाबाबत

संदर्भ:- आपले क्र.रानिआ २०१६/प्र.क्र.१७/का-२,
दि.०९.०५.२०१९ चे पत्र

उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने वित्त विभागाने नोंदविलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की , सहाव्या वेतन आयोगामध्ये अनेक पदाकरिता समान वेतनश्रेण्या अस्तित्वात होत्या . तथापि पदांनुसार ग्रेड -पे वेगवेगळे होते . सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी व ग्रेड -पे यांची सांगड घालून सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या तयार करण्यात आल्या आहेत. सातव्या वेतन आयोगानुसार ग्रेड-पे काढून टाकण्यात आलेला आहे . त्यामुळे सुधारित आकृतीबंधाच्या शासन निर्णयात अधिक स्पष्टता येण्याकरीता संवर्गनिहाय ६ व्या वेतन आयोगाच्या ग्रेड पे सह व ७ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या दर्शविण्यात आल्या आहेत .

२. राज्य निवडणूक आयोगातील उप सचिव,अवर सचिव, विधी अधिकारी, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी ही पदे मंत्रालयातील प्रशासकीय विभागातील समकक्ष पदांमधून बदलीव्दारे भरण्याची तरतूद आहे . तसेच याव्यतिरिक्त असलेली उर्वरित पदे महसूल व वन विभाग ,विधी व न्याय विभाग, नियोजन विभाग, वित्त विभागाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातून भरण्यात येत असली तरी सदर पदांची पदनामे व त्याकरिता असणारी वेतनश्रेणी ही मंत्रालयीन प्रशासकीय विभागापेक्षा भिन्न आहे . सदर पदांवरील नियुक्ती/पदोन्नती इ.सेवाविषयक बाबी राज्य निवडणूक आयोगाच्या सेवाप्रवेश नियमानुसार भरण्यात येतात.

३. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रामंध्ये कक्ष अधिकारी संवर्गात ४ वेतनश्रेण्या नमूद केल्यामुळे सदर संवर्गात पदोन्नती देताना नेमकी कोणती वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात यावी याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे असे नमूद करण्यात आले आहे . त्याअनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की. राज्य निवडणूक आयोगातील पदांची पदनामे मंत्रालयीन प्रशासकीय विभागाप्रमाणे म्हणजेच उप सचिव , अवर सचिव, कक्ष अधिकारी , सहायक कक्ष अधिकारी,लिपिक-टंकलेखक अशी आहे . तसेच त्या पदाकरिता असणारी वेतनश्रेणी व पदोन्नती साखळी मंत्रालयीन प्रशासकीय विभागाप्रमाणेच आहे. सबब सहायक कक्ष अधिकारी (७ व्या वेतन आयोगानुसार एस-१४: ३८६०० -१२२८००) या पदावरुन कक्ष अधिकारी या पदावर पदोन्नती देताना कक्ष अधिकारी (७ व्या वेतन आयोगानुसार एस-१७ : ४७६०० - १५११००) पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात यावी.

४. तसेच अवर सचिव या संवर्गात ८ पदे दर्शविण्यात आली आहेत . सदर पदांवर अवर सचिव. विधी अधिकारी, सहायक आयुक्त व तहसिलदार या अधिकाऱ्यांमधून आयोग आवश्यकतेनुसार भरु शकतील . मात्र हे अधिकारी ज्या पदावरुन आले असतील त्या पदाच्या वेतनश्रेण्या त्यांना लागू राहतील . कोणत्या पदावरील अधिकारी निवडावयाचे हा अधिकार आयोगास राहील . हेच निकष अन्य संवर्गाकरीता लागू असतील.

५. राज्य निवडणूक आयोगातील ग्रंथपाल व संगणक चालक ही पदे लिपिक टंकलेखक या संवर्गात दर्शविली असली तरी सदर पदावर सद्य :स्थितीत कर्मचारी कार्यरत असल्यामुळे सदर पदावरील व्यक्ती सेवानिवृत्त होईपर्यन्त त्या पदाची पदनामे व वेतनश्रेणी तीच राहील . सदर पदे रिक्त झाल्यानंतर लिपिक टंकलेखकाच्या नियुक्तीसाठी राज्य निवडणूक आयोगास २ पदे उपलब्ध होतील .

(चंद्रकांत डांगे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

कार्यासन ३७ संग्रहार्थ

४१५

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र कार्यालयातील पदांचा सुधारीत आकृतीबंध.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण -२०१६/ प्र.क्र.३७/का-३७,**

मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २३ जुलै, २०१९.

<u>वाचा :</u> १. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.३७/का-३७,दिनांक १२ एप्रिल,२०१९

**<u>शासन शुध्दीपत्रक</u>**

वाचा येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ मध्ये "राज्य निवडणूक आयोगातील ग्रंथपाल व संगणक चालक ही एकाकी पदे असल्याने, त्यांचा लिपीक टंकलेखक या संवर्गामध्ये समावेश करण्यास मान्यता दिली आहे. तथापि, सदर संवर्गात आल्यावर संबंधितांनी लिपीक-टंकलेखक संवर्गासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करणे आवश्यक राहील. तसेच, त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने कोणतेही आर्थिक लाभ, थकबाकी तसेच दावा करता येणार नाही. याबाबत

या ऐवजी ," राज्य निवडणूक आयोगातील ग्रंथपाल व संगणक चालक ही एकाकी पदे असल्याने राज्य निवडणूक आयोगातील ग्रंथपाल व संगणक चालक ही पदे लिपिक टंकलेखक या संवर्गात दर्शविली असली तरी सदर पदावर सद्य:स्थितीत कर्मचारी कार्यरत असल्यामुळे सदर पदावरील व्यक्ती सेवानिवृत्त होईपर्यन्त त्या पदाची पदनामे व वेतनश्रेणी तीच राहील. सदर पदे रिक्त झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगास लिपिक टंकलेखकाच्या नियुक्तीसाठी २ पदे उपलब्ध होतील . " असे वाचावे.

३. तसेच, शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रातील अनु.क्र.१० येथे

| अ.क्र | पदनाम | ६व्या आयोगानुसार वेतनश्रेणी | पद संख्या | अ.क्र. | संवर्ग | ६व्या आयोगानुसार वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | माहिती व जनसंपर्क अधिकारी | ९३००-३४८००-५००० | १ | ६ | सहायक आयुक्त (जनसंपर्क) | एस-१९ : ५५१००-१७५१०० | १ |

या ऐवजी पुढीलप्रमाणे वाचावे,

| अ. क्र | पदनाम | ६व्या आयोगानुसार वेतनश्रेणी | पद संख्या | अ. क्र. | संवर्ग | ६व्या आयोगानुसार वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | माहिती व जनसंपर्क अधिकारी | ९३००-३४८००-५००० | १ | ६ | सहायक आयुक्त (जनसंपर्क) | एस-१८: ४९१००-१५५८०० | १ |

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०७२३१५०२५२९६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT KRUSHNARAO DANGE

Digitally signed by CHANDRAKANT KRUSHNARAO DANGE
DN: c=IN, o=Personal, postalCode=400604, st=MAHARASHTRA, serialNumber=954ad83749ba79274c3a5435cc2a2064339d343d 556e1e9f6bc38bc0525314e2, cn=CHANDRAKANT KRUSHNARAO DANGE
Date: 2019.07.23 15:18:04 +05'30'

(चंद्रकांत डांगे)
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२. मा.अपर मुख्य सचिव,(वित्त विभाग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव तथा मु.रा.अ.यांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५. मा.सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक शाखा), नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई ३२
१०.उप सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११.उप सचिव,(कार्या-३७/कार्या-२५/कार्या-१९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२.अवर सचिव,(कार्या-३७/), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१३.वित्त विभाग (व्यय ४/अर्थसंकल्प १९/वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय,मुंबई-३२
१४.निवड नस्ती (कार्या-३७)